KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# 'आंतरजातीय विवाह: एक सामाजिक अध्ययन'

प्रा. डॉ. संदीप गढेकर
सहाय. प्राध्यापक व विभाग प्रमुख,
मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणि ज्य महाविद्यालय अंबड

**प्रस्तावना:-**

सामाजिक संस्था मधील कुटुंब संस्था तयार होण्यासाठी विवाह ही एक महत्वाची प्रकिया आहे. भारतात विवाह पध्दती एक संस्कार मानला जातो. सामाजात सर्वत्र वधू-वर निवडीचे निर्बंध सारखेच आहेत. जोडीदार हा स्वत:च्या जातीसमुहातील, धर्मातील, प्रांतातील, समुहातील असावा असे बंधनकारक आहे. मात्र याचे तंतोतंत पालन होतेच आसे नाही. प्राचीन काळापासुन भारतीय समाजात आंतरविवाह होत आलेले आहेत. या विवाहाला दिली जाणारी मान्यता ही सांस्कृतिक व वैचारिक पार्श्वभूमीवर अवलंबून असते. मुळ कुटुंबाचा विरोध असेल तर विविध प्रकारच्या समस्यांना या नवविवाहीतांना सामोरे जावे लागत आसते. यामळे ताण-तणाव, संघर्ष, भिती, कुढल्या ही कार्यक्रमात त्यांना बोलवले जात नाही, अपमान करतात, या सारख्या समस्या तयार होतात.

भारतीय समाजात अनेक विवाह प्रकार पाहवयास मिळतात. 'आंतरविवाह म्हणजे दोन विभिन्न जाती, धर्म, वंश, यांच्यातील समानता नसणाऱ्या भिन्न लिंगी व्यक्तिचा विवाह होय'. कन्नन सी. टी. यांचे मते, 'आंतरविवाह हे बहुतांश प्रेमविवाह आणि पालकांच्या संमतीविना झालेले आढळून येतात.' अशा प्रकारे व्यक्तीची स्वत:च्या मुळ कुटुंबाप्रती, नातेवाईकाप्रती, समाजाप्रती, असलेली मते व अनुभव समजून घेणे महत्वाचे ठरते. समाज, जात, धर्म, यानुसार यामध्ये फरक दिसुन येतो.

**संशोधनाचे उद्दिष्ट:-**

सदरील संशोधनामध्ये खालील प्रमाणे संशोधन उद्दिष्ट मांडण्यात आली आहेत.

- आंतरविवाहित व्यक्तिंच्या विवाहानंतर वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे गृहितक:-**

सदरील संशोधनामध्ये खालील प्रमाणे संशोधन गृहितके मांडण्यात आली आहेत.

- आंतरविवाहित व्यक्तिंच्या विवाहानंतर वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक जीवनात अनेक प्रकारच्या तडजोडी करतात.

**संशोधन आराखडा:-**

प्रस्तुत संशोधनामध्ये व्यक्ती, समुह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय वास्तविक तथ्यांचे, वैशिष्टयांचे वर्णनात्मक विश्लेषण करणे हा संशोधन आराखडयाचा प्रमुख उद्देश असतो. यानुसार समुदायाच्या जाती-धर्माचे, विवाह प्रकाराचे, आंतरविवाहरचे आणि कुटुंब प्रकाराचे इत्यादीचे वर्णन व विश्लेषण करणे आवश्यक आहे. वर्णनात्मक संशोधन मुलाखत-अनुसूची, प्रश्नावली, निरीक्षण, इत्यादी तंत्राचा समावेश होतो.

नमुना निवडतांना पुरूषांप्रमाणेच स्त्रियांना देखील समान संख्येने नुना घटक म्हणून निवडण्यात आला आहे. जालना जिल्हातील 50 नमुना निवडण्यात आला आहे. तथ्य संकलणात प्रथम व दुय्यम तथ्यांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन विश्लेषण:-**

सदरील संशोधनात मिळालेल्या माहितीचे आकडेवारीत विश्लेषण करण्यात आले. यामध्ये प्रश्नावली वापर करण्यात आला आहे. या प्रश्नावलीमध्ये बहू पर्याय स्वरूपात उत्तरे घेण्यात आली आहेत. प्रत्यक्ष निरीक्षण पध्दती नुसार देखल काही माहिती घेण्यात आली आहे. या माहितीचा उपयोग देखल करण्यात आला आहे. प्रश्नांच्या संदर्भात दिलेल्या उत्तराच्या रूपांतरण करण्यासाठी सारणीचा वापर करण्यात आला आहे. आलेले आकडेवारी ही विश्लेषणत्मक स्वरूपात मांडुन निष्कर्ष काढण्यात आले आहे.

सदरील विश्लेषण करतांना आंतरविवाहीत व्यक्तीना विवाहानंतर आलेले अभव याचा देखील विचार करण्यात आला आहे. जसेच अनेक साहित्यामध्ये, ग्रंथामध्ये, पुस्तकात, दैनिक वर्तमानपत्र, इत्यादी मध्ये असलेले माहितीचा देखल आधार सदरील संशोधनात वापर करण्यात आला आहे. यामुळे संशोनाचे निष्कर्ष व त्याची पडताळणी करणे सोपे झाले आहे. यानुसार शिफारशी करण्यास मदत झाली आहे.

**निष्कर्ष :-**

सदरील संशोधनामध्ये खालील प्रमाणे निष्कर्ष मांडण्यात आली आहेत.

- आंतरविवाहीत हा शहरी भागा पेक्षा ग्रामीण भागात कमी प्रमाणात दिसुन येते.
- सर्व जाती-धर्मात आंतरविवाह दिसुन आले आहे.

- विधवा, घटस्फोटत, यांचा समावेश असलेल्या आंतरविवाहाकडे समाजाचा समारात्मक दृष्टीकोन दिसुन येताना दिसतो.
- आंतरविवाहामुळे मुळ कुटुंबातील अविवाहीत इतर सदस्यांना विवाहासाठी समस्या तयार होते आहे.
- आंतरविवाहाकरणारे यांच्या मतानुसार पुरोगामी विचारामुळे नव्हे तर प्रेमामुळे विवाह केला आहे.

**शिफारशी:-**

सदरील संशोधनांतर खालील प्रमाणे संशोधन शिफारशी मांडण्यात आली आहेत.

- सामाजिक मानसिकता बदलने आवश्यक आहे.
- शासनाने आंतरविवाह केलेल्यांना आर्थिक मदत द्यावी यासाठी विशेष अशा अनदानाची व्यवस्था करण्यात यावी.
- सार्वजनिक कार्यक्रमात आंतरविवाह कारण्यासाठी शासनाने जनजागृती करणे गरजेचे आहे. यामुळे सामाजिक सलोखा तयार होण्यास मदत होईल.

**संदर्भ सुची:-**


1. Sur A. K. (1973), Sex and Marriage in India: An Ethno historical Survey, Bombay, Allied Publication.
2. प्रदिप आगलावे, (2000), संशोधन वध्दतीशास्त्र व तंत्रे, नागपुर, विद्या प्रकाशन
3. दैनिक सकाळ
4. www.google.com